# दि.१५.०२.२०११ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.१५.०२.२०११ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

## सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती | सभेतील निर्णय | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. | | |
| २ | टप्पा क्रं .१ व २ मऔविम क्षेत्र ट्रक टर्मिनल्स बांधकामाबाबत | ट्रकटर्मिनल्ससाठी टप्पा दोन मध्ये १४३९४ चौ.मि. भुखंड आरक्षीत झाल्याचे उपअभियंता, मऔविम, यांनी सांगितले व मुख्य कार्यालयाकडे प्रशासकिय मान्यता झाल्यानंतर बीओटी तत्वावर काम हाती घेणार असल्याचे सांगितले. | मऔविम, संबंधीत अधिका-यांनी पाठपुरावा करावा असे मा.अध्यक्षांनी सुचित केले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, औरंगाबाद. |
| ३ | मऔविम जुने औद्योगिक क्षेत्र जोडरस्ता बाबत | मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांनी संबंधित कामाचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील वर्षात रसत्याचे काम हातात घेण्यांत येईल असे सांगितले मा.अध्यक्षांनी लवकर कार्यवाहीच्या सुचना दिल्या | नगर पालिकेने शक्य तो लवकर पहाणी करुन अंदाजपत्रक तयार करावे. असे सर्वानुमते ठरले | मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद, जालना |
| ४ | मऔविमं क्षेत्र टप्पा १ व २ मधील रस्ते दुरुस्ती बाबत. | कार्यकारी अभियंता यांनी टप्पा १ व २ मधील रस्ते दुरुस्तीचे टेंडर लवकरच काढण्यांत येणार असल्याचे सांगितले बीटी पार्कजवळील रोड पुर्ण दुरुस्ती व इतर रोड पॅच वर्क करणार असल्याचे सांगितले. चर्चे मध्ये ओद्योगिक संघटनांच्या पदाधिका -यांनी संपूर्ण औद्योगिक क्षेत्रातील रस्ते दुरुस्त करावी असे सांगितले. | कार्यकारी अभियंता मऔविम यांनी पुढील सभेपुर्वी काम पुर्ण करावे असे सर्वानुमते ठरले | कार्यकारी अभियंता, मऔविमं, औरंगाबाद./ उपअभियंता, मऔविम, जालना |
| ५ | मऔविमं, टप्पा-१ व टप्पा-२ साठी पोलिस चौकी स्थापन करणे बाबत | मागील सभेत ठरविलेप्रमाणे मा.पोलिस अधिक्षक, जालना यांना पोलिस चौकी स्थापने बाबत कळविण्यांत आल्याचे सदस्य सचिव व महाव्यवस्थापक यांनी सभागृहास सांगितले प्रादेशिक अधिकारी मऔविम यांनी टेलिफोन कार्यालयाजवळील जागा पोलिस चौकीसाठी प्रस्तावित केल्याची माहीती सभागृहास दिली. | प्रस्तावित जागा पोलिस अधिक्षक कार्यालयाकडे शक्य तो लवकर हस्तांतरीत करावी. असे मा. अध्यक्षांनी सुचविले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, औरंगाबाद व मा.पोलिस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, जालना |

| आयत्यावेळेचे विषय | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | जुन्या औद्योगिक क्षेत्रातिल अतिक्रमने काढणे बाबत | अध्यक्ष, जालना औद्योगिक वसाहत यांनी जुन्या औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमने काढणे बाबत चर्चा केली मा.अध्यक्षांनी तसा लेखी पस्ताव द्यावा व पोलिस खर्चाची तयारी ठेवावी असे मा. अध्यक्षांनी सांगितले | जालना सहकारी औद्योगिक वसाहत यांनी प्रस्ताव द्यावा | कार्यकारी अभियंता, मऔविम, जालना |
| ७ | टप्पा क्रं ३ मधील लेऑऊट व भुखंड सर्वांना पहाण्यासाठी उपलब्ध करणे बाबत | लघु उद्योग भारती चे प्रतिनिधी अजय गटटाणी यांनी टप्पा तीन मध्ये छोटे भुखंड विकसीत करावे व त्याचा नकाशा सर्व उद्योजकांना पहाण्यासाठी उपलब्ध करावा असे सुचविले चर्चे मध्ये नकाशा मऔविम कार्यालयात पहाण्यासाठी उपलब्ध होईल असे मऔविम, प्रतिनिधी यांनी सांगितले. | टप्पा तीनचा नियोजित मान्य नकाशा मऔविम ने उपअभियंता कार्यालय, जालना येथे दर्शनी भागास लावावा असे सर्वानुमते ठरले. | कार्यकारी उपअभियंता, मऔविम, जालना |

सदस्य सचिव श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले

**स्वाक्षरित**
**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जालना.**

स्वाक्षरित
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जालना.**

# दि.१५.०२.२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा सल्लागार समिति सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.१५.०२.२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

## अ ) सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती / सभेतील निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. |
| २ | जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जाणा-या विविध योजनांचा आढावा | महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जाणा-या सुधारित बीजभांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्जयोजना, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, जिल्हा पुरस्कार याविषयीची ठळक वैशिष्टये सांगून माहे जानेवारी-२०११ अखेर प्रगती ( उद्दिष्ट/साध्य/खर्च ) अहवाल सादर केला.<br>मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम सर्वसाधारण/ विशेष घटक योजना / इत्यादी कार्यक्रमांवरील तरतूद माहे मार्च- २०११ पर्यन्त खर्च व्हावी. यावर सदस्य सचिव व महाव्यवस्थापक यांनी सभागृहास माहिती दिली की, सर्व योजनेतंर्गतचे खर्च व उद्दिष्टे मार्च २०११ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. |
| ३ | सन २०१० च्या जिल्हा पुरस्कारासाठी प्रस्ताव दाखल करणे . | सन-२०१० साठी जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत ४ पात्र उद्योग घटकांनी विहीत नमुन्यातील प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्र, जालना कार्यालयास सादर केले आहे.<br>१.सुरज कोटेक्स कॉटन जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्टरी, भोकरदन, जि. जालना.<br>२.रेणुका स्टोन क्रशर, गेवराई बाजार ता बदनापूर जि. जालना<br>३.खाकरे इंजिनिअरिंग, एमआयडीसी, जालना<br>४.श्रीगणेश स्टोन क्रशर, वाढोणा ता.भोकरदन जि. जालना.<br>पात्र उद्योग घटकाची निवड गुणानुक्रमे पथम सुरज कोटेक्स कॉटन जिनिग ॲन्ड प्रेसिंग फॅक्टरी, भोकरदन जि. जालना व द्वितीय क्रमांक रेणुका स्टोन क्रशर, गेवराई बाजार ता. बदनापूर जि.जालना यांची जिल्हा पुरस्कार योजना २०१० साठी निवड करुन मान्यता देण्यांत आली. सदर पुरस्कार वितरण १ मे २०११ रोजी करण्यांत यावा असे मा. अध्यक्षांनी सुचविले. |

सदस्य सचिव श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

स्वाक्षरित

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा सल्लागार समिती सभा,**
**जालना.**

**स्वाक्षरित**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा सल्लागार समिती सभा, जालना.**

# दि.१५.०२.२०११ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभेचे इतिवृत्त..

जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ), जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दि.१५.०२.२०११ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली. सभेसाठी सोबतच्या यादीप्रमाणे उद्योग संघटनांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सुरुवात केली. सभेत खालील मुद्यांवर चर्चा झाली.

## अ ) सभेत चर्चेसाठी असलेले विषय

| अ. क्रं. | मुद्दा | चर्चेची संक्षिप्त माहिती | सभेतील निर्णय | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. | | |
| २ | जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभेबाबतचा आढावा. | श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसनाबाबत शासनाच्या अलीकडील धोरणाबाबत सभागृहास माहिती दिली. तथापि, सदर योजनेतंर्गत जिल्हा उद्योग केंद्रास एकही अर्ज प्राप्त न झाल्याने यावर चर्चा होऊ शकली नाही. | | |

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या वतीने सभा संपल्याचे जाहीर केले

**स्वाक्षरित**
**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा,**
**जालना.**

**स्वाक्षरित**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा,**
**जालना.**

**जिल्हा उद्योग केंद्र, जालना**
**सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठया व विशाल औद्यौगिक उपक्रमांमध्ये**
**किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोक-यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबतची सभा**
**दि.१५.०२.२०११ रोजी दु.१.०० वाजता संमपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त**
**शासन निर्णय क्रं.स्थालोरो-२००८/प्रक्र.९३/उद्योग-६ दि.१७ नोव्हेंबर, २००८**

---

सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठया व विशाल औद्यौगिक उपक्रमांमध्ये किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबतची सभा दि.१५.०२.२०११ रोजी दु.१.०० वाजता मा.जिल्हाधिकारी , जालना यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री. विलास ठाकूर, भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा कार्यपथक समिती, जालना.
२. श्री. बी.डी.जंपावाड, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा कार्यपथक समिती, जालना
३. श्री.अ.मा.शिंदे, प्रादेशिक अधिकारी, मऔविमं, औरंगाबाद
४. श्री.डी.एस.परळीकर, उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जालना
५ श्री.किशोर अग्रवाल, अध्यक्ष, जालना इं.ए.असोसीएशन, जालना.

---

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना तथा सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्षांच्या समोर स्थानिक लोकांना रोजगाबाबतची माहे जानेवारी-२०११ अखेरची उद्योग घटकांबाबतची माहिती सभागृहास सादर केली. उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्हयातील सर्व घटकांकडे ८० टक्केपेक्षा जास्त स्थानिक कामगार असल्याचे सभागृहास निदर्शनास आणुन दिले. मा.अध्यक्षांनी जिल्हयातील सर्व उद्योग घटकांमध्ये मध्ये शासन निर्णयानुसार सथानिक कामगारांची नियुक्ती करण्यांत आली आहे किंवा नाही याबाबत माहिती चेक करुन घेण्यांत यावी असे मा.अध्यक्षांनी सुचित केले.

सर्व उपस्थित मान्वरांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिवानी जाहीर केले.

स्वाक्षरित
**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्य जिल्हा समिती,**
**जिल्हा उद्योग केंद्र, जालना**

**स्वाक्षरित**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**स्थानिक उमेदवारांना नोक-यांमध्ये प्राधान्य जिल्हा समिती,**
**जालना.**

# जिल्हा उद्योग मित्र, जिल्हा सल्लागार समिती,
# जिल्हा आजारी उद्योग पुनर्वसन समिती सभा
# दिनांक १५.०२.२०११ वेळ दुपारी ११.३०
# उपस्थितांची यादी

| अ.क्रं. | उपस्थित अधिकारी / प्रतिनिधी यांचे नांव | हुद्दा | कार्यालयाचे नांव | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | मा. श्री. विलास ठाकुर ( भा. प्र. से. ) | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | अध्यक्ष |
| २ | श्री. बी.डी.जंपावाड | महाव्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, जालना | सदस्य सचिव |
| ३ | श्री. बी.डी.राऊत | प्रभारी व्यवस्थापक | जिल्हा उद्योग केंद्र, जालना | सदस्य |
| ४ | श्री. अ.मा.शिंदे | प्रादेशिक अधिकारी | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ५ | श्री.राजेद्र गावडे | कार्यकारी अभियंता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ६ | श्री. दिलीप शेषराव परळीकर | उप अभियंता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद | सदस्य |
| ७ | श्री. किशोर अग्रवाल | अध्यक्ष | जालना इंडस्ट्रीयल इंटरप्रिन्युर्स असोसिएशन, जालना | सदस्य |
| ८ | श्री. दिपक सोमाणी | अध्यक्ष | लघुउद्योग भारती, जालना | सदस्य |
| ९ | श्री. डी. एस. मोरे | जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी | जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय, जालना | सदस्य |
| १० | श्री. अजय गट्टाणी | सचिव | लघुउद्योग भारती संघटना | सदस्य |
| ११ | श्री.ओमप्रकाश पंच | चेअरमन | जालना स.औ.व. जालना | सदस्य |
| १२ | श्री.डी.ई.नामवाड | मुख्याधिकारी | नगर परिषद, जालना | सदस्य |
| १३ | श्री.अशोक ज.नवघरे | अधिक्षक अभियंता | म.रा.वि.वि.के.जालना | सदस्य |
| १४ | श्री.एस.डी.पडवळ | जिल्हा अधिक्षक | कृषि अधिकारी कार्यालय, जालना | सदस्य |
| १५ | श्री.काझी मो.हनिफ | रोजगार व स्वंमरोजगार मार्गदर्शन अधिकारी | जिल्हा रोजगार व स्वंमरोजगार कार्यालय, जालना | सदस्य |
| १६ | श्री.एन.आर.अग्रवाल | लघु उद्योग भारती संघटना सदस्य | कनकधारा स्टील रि रोलिंग मिल, मऔविम, जालना | सदस्य |
| १७ | श्री.विजय बी. मित्तल | एम.डी. | शिव शक्ती रि रोलींग मिल प्रा.लि मऔविम, जालना | सदस्य |
| १८ | श्री.हेंमत कोळेश्वर | मॅनेजर | जालना को.इं.ईस्टेट, मऔविम, जालना | सदस्य |

**स्वाक्षरित**
**महाव्यवस्थापक तथा,सदस्य सचिव,**
**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा,जालना.**